स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील शाळा
परवानगी आदेश

जा.क्र./स्वयंअ/माध्य-1/2013-2014/ 16732/83
विभागीय शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद
औरंगाबाद विभाग औरंगाबाद,
दिनांक : - 6 AUG 2013

प्रति,

अध्यक्ष/सचिव,
मानव विकास कलयाण प्रतिष्ठाण औरंगाबाद

विषय :- सन 2013-2014 या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणे तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी परवानगी देण्या बाबत.

संदर्भ :-1) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन असाधारण क्रं.4,6 व 24) 2012.

2) महाराष्ट्र शासनाचे शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचा शासन निर्णय क्रमांक स्वयंअ-2013/(85/13) माशि-1/ मंत्रालय मुंबई 32 दिनाक 15 जुन 2013.

उपरोकत विषयी आपणास कळविण्यात येते की, आपल्या जिल्हयातील संस्थेने महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियम) अधिनियम 2012 अंतर्गत शैक्षणिक वर्ष 2013-2014 मध्ये **नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विधमान शाळेचा दर्जावाढ करण्याकरीता** प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावानुसार संस्थेस संदर्भ क्र. 02 च्या शासन निर्णयानुसार **नवीन शाळा स्थापन करणेकरिता/ विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्याकरीता** खालील अटी व शर्तीवर परवानगी दिलेली आहे.

| अ. क्र. | संस्थेचे नांव व सविस्तर पत्ता | मान्यता मिळालेल्या शाळेचे नांव व पत्ता | माध्यम | शाळेचा प्रकार<br>नविन शाळा/ दर्जावाढ | मान्यता वर्ग/इयत्ता | मान्यता वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1465 | मानव विकास कलयाण प्रतिष्ठाण औरंगाबाद | शिवाजी इंटरनूशनल स्कूल, विद्या प्रबोधनी संकुल शहापूर बंजर औरंगाबाद लासूर स्टेशन रोड न्यु मुंबई हायवे खोजेवाडी फाटा ता. गंगापूर जिल्हा औरंगाबाद. | **इंग्रजी** | **नविन शाळा** | **1 ली** | **2013-2014** |

**अटी व शर्ती**

1) संस्थेने शाळा परवानगीसाठी विहित केलेले माध्यम व शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणतेही बदल करता येणार नाही.

2) शासनाने ज्या ठिकाणासाठी परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळासुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

3) या अधिनियमातील तरतुदींनुसार शाळा स्थापित करण्यास दिलेली परवानगी शैक्षणिक वर्ष 2013-2014 पासून असेल.

4) शैक्षणिक वर्ष 2013-2014 मध्ये ज्या वर्गास परवानगी दिलेली आहे त्या वर्गा व्यतिरीक्त इतर वर्ग चालू करता येणार नाहीत.

Shivaji International school
(CBSE)

पान दोन. .

5) परवानगी मिळाल्यापासून **अठरा महिन्याच्या** आत व्यवस्थापनाने शाळा सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.

6) परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा यांना शासनाच्यावेळोवेळी निर्गमीत होणाऱ्या आदेशाचे, कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 मधील सर्व तरतुदीचे पालन करणे बंधनकारक राहील.

7) शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहिती करिता **स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी पात्र नवीन शाळा/वर्ग** असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील.

8) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांची भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.

9) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी प्राप्त शाळांना बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 मधील तरतुदीची पूर्तता करुन स्यवस्थापनाने शाळा मान्यतेकरिता **माध्यमिक शाळा संहिता नियम क्र.3.1 परिशिष्ठ 02 मधील विहित नमुन्यात एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेचा प्रस्ताव सक्षम अधिकाऱ्याकडे** सादर करणे आवश्यक राहील.

10) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना **UDISE** मध्ये माहिती भरतांना **स्वयंअर्थसहाय्यित शाळा/वर्ग** म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.

11) दर्जावाढ मंजूर झालेल्या शाळामध्ये भौतीक सुविधा उपलब्ध असणे आवश्यक राहील. प्राथमिक शाळांच्या संदर्भात RTE act.2009 मध्ये नमुद केलेल्या सर्व मानकांची पुर्तता करणे बंधनकारक राहील.

शासनाने सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहित करेल अशा नियमांची अंमलबजावणी करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

सन 2013-2014 या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणे तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी संस्थांतर्गत शाळांना या आदेशान्वये परवानगी देण्यात येत आहे.

**(सुखदेव डेरे)**
शिक्षण उपसंचालक,
औरंगाबाद विभाग, औरंगाबाद.

प्रतिलिपी : माहितीस्तव सविनय सादर

1) मा.प्रकाश ठुबे, सहसचिव, महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग मंत्रालय विस्तार भवन मुंबई.
2) मा.शिक्षण संचालक, (माध्य. व उच्च माध्य.) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे-1.
3) संबंधित संस्था अध्यक्ष/सचिव/ मुख्याध्यापक. यांना माहितीसाठी.
4) शिक्षणाधिकारी **(प्राथमिक)** जिल्हा परिषद, **परभणी** यांना देवून कळविण्यात येते की, संस्थेने प्रस्ताव सादर करतांना दाखल केलेल्या कागदपत्राची खातरजमा करावी शासन निर्णय क्र. स्वयंअ/ 2013/(85/13/)माशि-1 दिनांक 15/06/2013 नुसार कार्यवाही करावी.